बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२१८ ■ सोमवार १९ मे २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.No./DHL/53/24-26

उत्कृष्ठ क्वालिटी
शेंगदाणे १०० रु.किलो
जीरा २८० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## प्रोटोकॉलवरुन सरन्यायाधिशांची उघडपणे नाराजी बार कौन्सिलतर्फे सत्कार; अधिकाऱ्यांची धावाधाव

**मुंबई, दि.१८- महाराष्ट्र राज्याचा एक व्यक्ती सरन्यायाधीश म्हणून राज्यात पहिल्यांदा येत असताना, महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना, महाराष्ट्राच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि मुंबई पोलीस आयुक्तांना तिथं येण्याची योग्यता वाटत नसेल तर त्याबद्दल त्यांनीच विचार केला पाहिजे, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नाराजी व्यक्त केली आहे.**



सर्वोच्च न्यायालयाचे ५२ वे सरन्यायाधीश आणि महाराष्ट्रपुत्र भूषण गवई यांनी मुंबईत बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्याकडून करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यात विविध मुद्यांवर भाष्य केले. सत्काराच्या भाषणाच्या समारोपावेळी महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि पोलीस यंत्रणेचे प्रमुख उपस्थित न राहिल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर तातडीने पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्य सचिव सुजाता सौनिक सरन्यायाधीशांच्या भेटीसाठी दादर येथील चैत्यभूमीवर दाखल झाल्या. सूर्यकांत, न्यायमूर्ती अभय ओक, न्यायमूर्ती दिपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराध्य, केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश नितीन जामदार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. (पान ४ वर)

## बीड, शिर्डी, पुण्यात ढगफुटीसदृष पाऊस

पुणे, दि.१८- महाराष्ट्रात रविवारी ढगफुटीसदृष पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज खरा ठरला आहे. बीड, शिर्डी, रायगड, कोल्हापूर, पुण्याला धोधो पाऊस बरसला. राज्यातील चार जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. २९ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे, पुणे सातारा सांगली सोलापूरला या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. तर मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर, संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ (पान ४ वर)



## वीर सावरकर पुतळ्याचे सुशोभिकरण रखडले वाहन चालकांची कसरत, प्रवाशी झाले बेहाल

**धुळे, दि.१८- देवपूरमधील अतिशय प्रमुख ठिकाण असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाचे रूपांतर अपघाताच्या सापळ्यात झाले आहे. असे असतानाही महानगरपालिकेचे त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.**



स्वातंत्र्यवीर सावरकर चौक अर्थात सावरकर पुतळा हा धुळे शहराच्या देवपूर भागातील एक प्रमुख चौक आहे. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून सदर पुतळा सुशोभीकरणाच्या नावाखाली झाकून ठेवला आहे. त्याचप्रमाणे पुतळ्याच्या आजूबाजूस असलेला कठडादेखील काढून टाकण्यात आला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा तेथेच ठेवणार की शेजारच्या छत्रपती संभाजी उद्यानात बसवणार, याविषयी अद्याप निर्णय झालेला नाही. मात्र सुशोभीकरणाच्या नावाखाली शहरातील एका प्रमुख चौकाची प्रचंड दुर्दशा झाली आहे.

पुतळ्याचे सुशोभीकरण सुरू असल्याने संपूर्ण चौकात खडी पसरली आहे. या चौकातून कालीपिली वाहतूक तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसेस देखील या चौकात थांबतात. त्यामुळे प्रवाशांसह शालेय विद्यार्थी देखील या चौकातूनच वाहतूक करत असतात. मात्र चौकात सर्वत्र खडी पसरलेली असल्याने अनेकदा दुचाकी आणि चारचाकी वाहने घसरुन अपघात घडण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे हा चौक आता अपघाताचा सापळा बनला आहे. नागरिकांनी याबाबत वारंवार तक्रारी करुनही पालिका प्रशासन याकडे लक्ष देण्यास तयार नाही. ठेकेदाराने काम का थांबविले? याबाबत शंका कुशंका व्यक्त होत आहेत.


**पावसाळ्यापूर्वी काम व्हावे**

सध्या जिल्ह्यात अवकाळी पाऊस अधुनमधून येत आहे. लवकरच पावसाळा देखील सुरु होणार असल्याने पावसाळ्या पूर्वी सदर काम होणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा पावसाळ्यात या ठिकाणी पाणी तुंबून लहान मोठ्या अपघातांना सामोरे जावे लागेल, अशी परिस्थिती आहे. आमदार अनुप अग्रवाल यांनी यासाठी पुढाकार घेवून पालिकेला सदर काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी बजावावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## नंदुरबारमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाडे उन्मळून पडली, विद्युत ताराही तुटून पडल्या

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी) - शहरात शुक्रवारी झालेल्या मुसळधार अवकाळी व वादळी पावसामुळे मध्यवर्ती भागात झाडे उन्मळून पडल्याने विद्युत ताराही तुटून पडल्या. त्यामुळे शुक्रवारी सायंकाळी सहा वाजेपासून ते शनिवारी रात्री पहाटे पर्यंत अर्धी नंदनगरी सलग दोन दिवस अंधारात राहिली. तसेंच शहर व परिसरात ५८ घरांची पडझड पाहायला मिळाली.**

नंदुरबार शहरासह परिसरात १६ मे रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास प्रचंड वादळी वाऱ्यासह विजांचा गडगडाट करीत अवकाळी पावसाला मुसळधार सुरवात झाली. तब्बल १ तास वादळी पाऊस झाल्याने सखल भागात पाणी साचले होते. या पावसादरम्यान तुफान वादळी, वारा आणि विजांचा प्रचंड कडकडाट झाल्याने नंदुरबार शहरातील अनेक मध्यवर्ती असलेल्या भागांमध्ये १०० वर्ष जुनी झाडे उन्मळून पडली. त्यामुळे विद्युत प्रवाह करणाऱ्या तारा देखील तुटून पडल्या. म्हणून नंदुरबार शहरातील वीज पुरवठा पूर्णपणे खंडीत झाला होता. तर काही भागातील वीज पुरवठा रात्री अकरा वाजेनंतर पूर्ववत सुरु झाला. परंतू शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या वसाहतींमध्ये सलग दोन दिवस बत्तीगुल राहिली. शुक्रवारी सायंकाळी सहा वाजेपासून खंडीत झालेला वीज



पुरवठा बंद राहिल्याने दुसऱ्या दिवशी शनिवारी दिवसभर अंधार होता. महावितरण कर्मचाऱ्यांकडून तुटलेल्या तारा दुरुस्ती करण्याचे काम सुरु होते. नंदुरबार शहरातील जवळपास अर्धी नंदनगरी सलग दोन दिवस काळोख्याच्या अंधारात राहिली. कारण अनेक ठिकाणी उन्मळलेली झाडे विद्युत रोहीत्र व तारांवर पडल्याने वीज पुरवठा पूर्णपणे बंद झाला होता. शहरातील जळका बाजार, शिवाजी रोड, बागवान गल्ली, साक्रीनाका परिसर, माळीवाडा अशा अनेक मध्यवर्ती भागात वीज गायब होती.

शहरासह तालुक्यात शुक्रवारी झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाच्या हजेरीमुळे ५८ घरे व एक गोठ्याची अंशतः पडझड झाली आहे. या नुकसानीत एक पोल्ट्रीफार्मचे देखील नुकसान झाले आहे. तसेच ठाणेपाडा, आष्टे, खामगाव या ठिकाणी आंब्याचे झाड आणि कांदा, केळी व पपई पिकाचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचा पंचनामा करण्याची मागणी होत आहे. दरम्यान नंदुरबार शहरात ४० मी.मी. पाऊसाची नोंद झाली आहे. नंदुरबार तालुक्यात ५८ घरांची पडझड व विजांचा लखलखाट होवून वादळी वारा सुटल्याने अनेक (पान ४ वर)



## प्रतिकुल परिस्थितीत भाज्या महागल्या किलोमागे सरासरी २५ रूपयांची वाढ

**धुळे, दि.१८- बदलत्या वातावरणामुळे धुळे शहराच्या भाजी बाजारात भाज्याची आवक कमी झाली आहे. आवक कमी झाल्याने भाज्यांच्या दरात वाढ झाली आहे. गेल्या आठ दिवसांपासुन भाजीपाल्याच्या दरात किलोमागे २५ ते ३० रूपयांची वाढ झाली आहे. भाजीपाला सरासरी ७० रूपये किलो झाला आहे. अशीच परिस्थिती एक महिना कायम राहिल. त्यामुळे भाजीपाल्याचे दर अजुन महागणार आहेत. साहजिकच मध्यमवर्गीय महिलांनी भाजीपाल्याच्या दरवाढीवर नाराजी व्यक्त केली आहे.**

धुळे तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकरी प्रयोगशील झाले आहेत. बहुसंख्य शेतकऱ्यांनी पारंपारीक पिकांना फाटा देत भाजीपाला उत्पादनात अग्रेसर झाले आहेत. उन्हाळयातील मागणी लक्षात घेता बहुसंख्य शेतकरी भाजीपाल्याचे उत्पादन घेवु लागले आहेत. धुळे तालुक्यातील कापडणे, धनुर, देवभाने, निकुंभे, बोरीस, लामकनी, फागणे, कुडाणे, वरखेडी या गावांमधील शेतकरी पालेभाज्या आणि फळभाज्यांचे उत्पादन घेत आहेत. त्यात गिलके, दोडके, कारले, भोपळा, गंगाफळ, वांगी, कोबी, गडड्‌ कोबी या बरोबरच मेथी, पालक, पोकळा, अंबटचुका या पालेभाज्यांच्या बाजारात येत (पान ४ वर)

## शहाद्यात नवीन क्रीडा संकुलाबाबत जाब विचारण्यासाठी आंदोलन

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- शहादा शहरातील मध्यवर्ती भागात परिसरातील आणि शहरातील नागरिकांना कुठलीही पूर्व कल्पना न देता सार्वजनिक बांधकाम आणि क्रीडा विभागामार्फत बेकायदेशीररित्या बांधकाम करण्यात येत आहे. म्हणुन मूळ मालक असलेल्या नगरपालिका प्रशासनाला झोपेतून जागे करण्यासाठी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला जाब विचारण्यासाठी परिसरातील आणि शहरातील नागरिकांच्या वतीने सोमवार दि.१९ मे रोजी दुपारी ३ वाजता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे.**



या आंदोलनाला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन क्रीडा संकुल परिसरातील नागरिक आणि शहादा शहर वासीयांकडून सोशल मीडिया नेटवर्कद्वारे करण्यात आले आहे. क्रीडा विभागाने यापूर्वी करोड रुपये खर्च करून शहराच्या मध्यवर्ती भागात क्रीडा संकुल उभारले आहे. त्याची झालेली दुरावस्था सर्वज्ञात आहे. गेट, ग्रिल, दारे, खिडक्या पासून सर्व चोरी झाली आहे. आज थोड्या फार प्रमाणात स्वखर्चाने क्रिकेट खेळणारे सोडले तर त्या क्रीडा संकुलचा वापर अनेक बेकायदेशीर कामासाठी होत असल्याची वस्तुस्थिती आहे. क्रीडा विभाग किंवा नगर पालिका प्रशासन देखभाल करण्यास सक्षम नाही असेच सध्याची परिस्थिती पाहता दिसून येत आहे. बेवारस असलेल्या क्रीडा संकुलाचा वापर दारू पिणारे, मस्ती करणारे बिनधास्तपणे करत आहेत. रात्री बेरात्री वाढदिवस साजरा करत मोकाट गोंगाट करत,फटाके पेटवले जातात. आजूबाजूच्या रहिवासीयांना काय त्रास होतो याचा विचार कोणी करत नाही. यापूर्वी बांधकाम करण्यात आलेली क्रीडा संकुल इमारत बेवारस अवस्थेत पडून आहे. त्याशेजारी असलेल्या खुल्या जागेत सुरु असलेल्या नियोजित कामाचा बोर्ड नाही म्हणून कोणत्या योजनेत काम सुरु आहे? कोण ठेकेदार (पान ४ वर)



## अहिल्याबाई होळकरांच्या जयंतीनिमित्त भाजपतर्फे राज्यभर कार्यक्रमांचे आयोजन

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी) - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची माहिती होण्यासाठी राज्यभर विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने संपूर्ण राज्यात २१ मे ते ३१ मे पर्यंत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी ३०० वर्षापूर्वी केलेला प्रशासनिय कार्य, देव धर्मासाठी त्यांनी केलेला नवनिर्माण असेल या व्यतिरिक्त एक उत्तम प्रशासन असेल न्याय प्रविष्ट भूमिका असेल, आदिवासी शेतकरी आणि प्रजेसाठी केलेले अनेक लोक कल्याणकारी कार्यक्रम आणि उपक्रम आहेत. हे कार्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी निर्माण केलेल्या मंदिरावर (पान ४ वर)

## ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ शिरपूरमध्ये आज तिरंगा यात्रा

**शिरपूर, दि.१८- शिरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती येथून १९ मे रोजी सकाळी ८ वाजता सर्वपक्षीय, सर्वधर्मीय, जिल्हास्तरीय तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे. सर्व देशप्रेमी बंधू, भगिनी यांनी या भव्य तिरंगा यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट करुन टाकले. तसेच पाकिस्तानच्या संरक्षण दृष्ट्या अत्यंत महत्वाच्या ठिकाणांचेही या हल्ल्यात मोठे नुकसान केले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ पक्षातर्फे देशभर भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे. सदर जिल्हास्तरीय तिरंगा यात्रा १९ मे रोजी सकाळी ८ वाजता शिरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती येथून आर.सी.पटेल मेन बिल्डिंग समोरून, शिरपूर वरवाडे नगरपालिका, कुंभार टेक, पाटील वाडा, स्वामी रेडियम कडून गुजराथी कॉम्प्लेक्स, मेन रोड ने श्री पाताळेश्वर (पान ४ वर)

## कवळीथ गावाजवळ एसटी बस खड्ड्यात उतरल्याने अपघातात पाच प्रवाशी गंभीर जखमी; बसचे नुकसान

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- शनिवारी दुपारी जावदा (ओझर्टा) ते शहादा एसटी बस कवळीथ गावाजवळ रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात उतरल्याने झालेल्या अपघातात पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.या अपघातात सुदैवाने जीवित हानी टळली असली तरी एसटी बसचे मोठे नुकसान झाले आहे.अपघातानंतर मदतीसाठी ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.जखमींना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालयात व प्राथमिक उपचारानंतर नंदुरबार जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.**

याबाबत अधिक वृत्त असे, शहादा आगाराची बस क्रमांक



एमएच १४ बीटी १३५५ जावदा (ओझर्टा) ते शहादा ही कवळीथ गावाजवळील शेत शिवारात रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात उतरल्याने एसटीतील सुमारे ६० पैकी काही प्रवासी जखमी झाले. अपघातानंतर जोरदार आवाज झाल्याने शेत शिवारात काम करणारे शेतकरी तसेच ग्रामस्थांनी घटनास्थळी मदतीसाठी गर्दी केली. या अपघातात एसटीतील प्रवासी शंकर खंडू कुंभार कवळीथ, मंगलाबाई अहिरे कवळीथ, नम्रता विलास भील कवळीथ, धनराज गोविंद पाटील कवळीथ, बेबीबाई वसंत शिंदे टुकी हे पाच जण गंभीर जखमी झाले आहेत तर चालक जी. जी.पाटील व वाहक टी.आर.पाटील यांना किरकोळ मार लागला आहे. गाडीत एकूण साठ प्रवासी असल्याचे सांगितले जात आहे.जखमींना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले व प्राथमिक उपचारानंतर पाच जणांना नंदुरबार जिल्हा रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नसली तरी एसटी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत याप्रकरणी शहादा पोलीस स्टेशनला अपघाताची खबर दिली आहे. उशिरा पावेतो या अपघात प्रकरणी पोलिसांत नोंदचे काम सुरू होते.

उठावणा एवम् शोक बैठक



बड़े दुख के साथ आपको सूचित किया जाता है कि कमलकिशोर मोहनलाल एवं राजीव मोहनलाल इनके बडे भाई तथा संजय एवं संदीप इनके पिताजी तथा यश एवं विनीतके दादाजी

**श्री.ओमप्रकाश मोहनलाल अग्रवाल**

इनका दुखद निधन हो गया है।
इनका **उठावना** आज सोमवार, दि.१९०५-२०२५ को समय शामको ४ बजे अग्रवाल भवन, ऊसगल्ली, धुलिया यहा पर है एवं उनकी
**शोक-बैठक** मंगलवार दि.२०-५-२०२५ से गुरुवार दि.२२-५-२०२५ तक दोपहर ४ बजेसे ६ बजेतक उनके निजी निवास- प्लॉट नं.२००, पांडव प्लाझा के सामने, ऐंसी फुटी रोड, धुलीया यहाँ पर है.

-: शोकाकुल :-
कमलकिशोर मोहनलाल अग्रवाल राजीव मोहनलाल अग्रवाल
संजय ओमप्रकाश अग्रवाल संदीप ओमप्रकाश अग्रवाल
दर्शन, यश, विनीत, करण
**एवं समस्त केजडीवाल परिवार**

फर्म : मे ओमप्रकाश मोहनलाल केजरीवाल
तिरुपति ट्रांसपोर्ट
श्री बालाजी एंटरप्रायझेस

## खासदार डॉ.शोभाताई बच्छाव आज धुळ्यात

धुळे, दि.१८- नियोजित आयुष हॉस्पिटल उभारणीबाबत जागेची पाहणी करण्याबरोबरच विविध कामांचा आढावा घेण्यासाठी खासदार डॉ.शोभाताई बच्छाव सोमवारी १९ मे रोजी धुळे दौऱ्यावर येत आहेत. सकाळी १०.३० ते ११.३० दरम्यान खा.बच्छाव हॉस्पिटलच्या जागेची पाहणी करतील. यानंतर ११.३० ते १ सिंचन भवन येथे अक्कलपाडा धरण शंभर टक्के कार्यान्वित करण्याबाबत आढावा बैठक होईल. मंगळवारी २० मे रोजी महापालिकेत आढावा बैठक होईल तर दुपारी चार वाजता त्या नकाणे तलावाची पाहणी करणार आहेत.

सेंद्रिय जांभुळ



संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
* संपर्क *
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## पक्षात काम करा, ते नवा इतिहास घडवण्यासाठी! रा.यु.काँ. प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाणांचे आवाहन

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी) - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने सदस्य नोंदणी अभियान राबवण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी सज्ज व्हावे. पक्ष मजबूतीसाठीच नंदुरबार जिल्हयाचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादीकडे राखून ठेवण्यात आले. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी खचून न जाता पक्ष मजबूतीसाठी कामाला लागावे. यापुढे कुठलीही अडचण येणार नाही, याची काळजी घेतली जाईल. शासकीय योजनांच्या माध्यमातुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तळागाळापर्यंत पोहचवा. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेस मेळाव्याला संबोधित करतांना केले.**




मदर टेरेसा हायस्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस जोडो अभियान २०२५ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अमर पाटील, रणजित नरुटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -89,300 रु.+3% GST
सोने- 24 K -94,200 रु.+3% GST
चांदी- 99,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## बापाच्या मनातील कळवळा : पण बाप पास मुलगा नापास

मातृहृदयी पूज्य साने गुरुजींच्या खानदेश या कर्मभूमीत आपण वावरतो. त्यांनी आपल्याला मातेची महती सांगितली. मातेचे ममत्व आणि माया काय असते त्याचे दर्शन दिले. समाजही त्याविषयी जाणतो. अर्थात मातेचे कर्तुत्व तेवढे असते. त्याला काही मोजमाप असू शकत नाही. तिच्यामुळेच आपण जग बघितलेले आहे. पण आपले बिजारोपण बापाने केलेले असते. तो मोठा असो, मध्यम असो की गरीब असो, मुलांसाठी आयुष्यभर तो जे काही करत असतो त्याची महती मात्र आपण गात नाही. पण त्यासाठी तो काम करीत नसतो तो आपले कर्तव्य करीत असतो असे मानतो. ज्या दिवशी मुले बापाने आमच्यासाठी काय केले. जे केले ते त्याचे कर्तव्य होते असे म्हणू लागतात त्या दिवशी बापाचे कर्तुत्व शून्यवत होत असते. अशी अनेक मुले आहेत की ज्यांनी कोरोना काळात आई बापाला भरती करून ते स्वत: पळून गेले. त्यांच्या मृत्यूनंतर आले आणि त्यांच्या इस्टेटवर डल्ला मारला. मात्र अशी अनेक मुले आहेत की बापाच्या संपत्तीचा त्यांना मोह नाही. ते स्वत:च्या मेहनतीवर आणि कर्तृत्वावर मोठे झाले. आणि जन्मदात्या बापाचे उपकार कधीच विसरले नाहीत. त्यांचे कर्तव्य ते करीत असतात. त्याचेही काही मोजमाप नसते. त्याची प्रसिद्धी नसते. ते देखील त्यांचे कर्तृत्वच बजावत असतात असे म्हणण्याची जगरहाटी असली तरी तसे वागणे काही त्यांना बंधनकारक असत नाही. पण ज्यांना जाणीव असते ते करीत राहत असतात. थोडक्यात सांगायचे तर वडील असोत की आई असो मुला बाळांसाठी ते अव्याहत झटत असतात. त्यांचे पुढील आयुष्य सुखाचे जावे यासाठी धडपडत असतात. पण बापाचे दु:ख कधी आपण बघत नसतो. किंवा त्याची आपल्याला जाणीव नसते. तो आपल्या मनात काय दडवून ठेवतो हे कधीच दाखवत नाही. फक्त काम करीत असतो, राबत असतो. कारण तो बाप असतो. हा विषय इथे उपस्थित करण्याचे कारण आहे. नुकताच दहावीच्या परीक्षेचा निकाल आला. विदर्भातील एका मुलाला सतत अभ्यासाचा लकडा लावणाऱ्या बापाला पोराने सुनावले की तुम्ही दहावी नापास झाला होता. तेव्हा स्वत: दहावी पास करून दाखवा म्हणजे तुम्हाला दहावी काय असते ते कळेल. बापाने हे आव्हान स्वीकारले. बारा नंबरचा फॉर्म भरला, रात्रंदिवस अभ्यास केला, परीक्षा दिली आणि पास झाला. पण ज्या मुलाच्या मागे त्याने अभ्यास कर म्हणून तगादा लावला होता तो मात्र नापास झाला. ही घटना प्रतिनिधिक असली तरी तिच्याकडे गांभीर्याने आणि सकारात्मक दृष्टीने बघण्याची आवश्यकता आहे. कारण परिस्थिती तशीच आहे. मुले ऐकत नाहीत. ती उंडारत असतात, अभ्यास करीत नाहीत, चकाट्या मारतात, बाबाच्या पैशावर मजा मारतात. मोबाईल वरील गरज नसलेल्या गोष्टीत दिवसभर अडकलेले असतात. व्यसनी होतात. मानसिक दृष्ट्या बहकून जातात. त्यांना सरळ करायला आई-वडिलांना फार कष्ट पडतात. तरीही ते सरळ होतातच असे नाही. खूप मुले अशी आहेत की ती आई-वडिलांच्या हातातून निघून गेलेली आहेत. त्यामुळे ते जे काही दु:ख आई-वडिलांच्या वाट्याला येते ते शब्दात व्यक्त करता येणार नाही. मुलांसाठी बाप कष्टकरी असेल तर तो खपतो. पण मुलगा उनाड निघाला तर त्याच्या दु:खाचा काय अंदाज करावा. हे ज्याने भोगले आहे तोच जाणून शकतो आणि त्यांची संख्या तुम्हाला पावलोपावली सापडेल.

दहावी पास झालेल्या वडिलांची आणि नापास झालेल्या मुलाची कथा ही चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. गोंडपिपरी तालुक्यातील वडोली या गावचे अनिल कडगलवार हे मजुरी करतात आणि रोजी रोटी चालवतात. त्यांना दोन मुले आहेत. आपण आपल्या आयुष्यात काही करू शकलो नाही. परंतु मुलांनी शिकून मोठे व्हावे. आणि सुखी जीवन जगावे असे त्यांना वाटत होते. त्यामुळे ते दहावीत असलेल्या प्रिन्स नावाच्या आपल्या मुलाच्या मागे सतत अभ्यासासाठी तगादा लावत होते. आपण शिक्षण घेतले तरच आपला निभाव लागेल असे ते मुलाला सांगत असत पण मुलाला त्याचा राग आला. तो वडिलांना म्हणाला की तुम्ही दहावीची परीक्षा नापास झाला होता. ती पास होऊन दाखवा. वडिलांनी मुलाचे ते आव्हान स्वीकारले आणि २८ वर्षानंतर दहावीची परीक्षा दिली आणि उत्तीर्ण झाले. याउलट प्रिन्स नापास झाला. ते १९९७ साली नापास झाले होते. त्यांनी शिक्षणाचा नाद सोडून दिला. आणि कष्टाच्या कामाला लागले. परंतु आपली जीवनशैली मुलाच्या वाट्याला येऊ नये असे त्यांना वाटत होते म्हणूनच ते मुलाला अभ्यासासाठी उद्युक्त करीत होते. परंतु मुलगा आताच्या पिढीतील असल्यामुळे तो ऐकायला तयार नव्हता उलट त्यानेच बापाला आव्हान दिले. यातून दोन मुद्दे पुढे येतात. एक असा की जिद्द आणि जिज्ञासा असेल तर यशस्वी होण्यासाठी वय आडवे येत नाही. दुसरा मुद्दा बापाला असलेल्या कळवळ्याचा आहे. तो समजून घेतला पाहिजे. आणि तिथेच मुले चुकतात. अशी भरपूर मुले आहेत. की त्यांचे आई-वडील त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करतात. त्यांचे लाड करतात. त्यांना हवे ते देतात. मुले सुद्धा खूप शिकतात. त्यापैकी सर्वांनाच रोजगार मिळतो असे नाही. ज्यांना मिळत नाही त्यांचा वापर आजच्या काळात धार्मिक उन्माद निर्माण करण्यासाठी होतो. आपला वापर हे तरुण त्यासाठी करू देतात. त्यात ते वाहत जातात. आई घरात असते. बाप खपत असतो. आपले चिरंजीव काय करतात याची त्यांना माहिती नसते. मुले दूर निघून गेलेली असतात. त्याचे जे बापाला दु:ख असते ते शब्दात वर्णन करता येणार नाही. बापाने केलेल्या कमाईवर बहुतेक मुले मजा करताना दिसतात. जे कामाला लागतात. त्यांची घराची नाळ तुटते. जे काही अपवाद यात आहेत त्यांच्यावर समाज चालू आहे. त्या तुलनेत मुली बापाची जास्त काळजी घेतात. त्यांची भावनात्मक तार बापाच्या भावनांशी जुळलेली असते. ती अधिक सजग असते. प्रतिनिधिक स्वरूपात एक चित्रफित समाज माध्यमांवर काही दिवसांपूर्वी फिरत होती. प्राथमिक शाळेतील एक मुलगी आपल्या वडिलांना चॉकलेट साठी पैसे मागत असे. वडील तिला देत असत. एकदा किराणा दुकानदाराला त्यांनी सांगितले की पैसे नसले तरी चॉकलेट देत जा मी योग्य वेळी ते देत जाईन. पण दुकानदार सांगतो की तुमची मुलगी गेले काही दिवसांपासून (पान ३ वर)

## एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. शिरपूर कॅम्पस येथे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**शिरपूर, दि.१८- एस.व्ही.के.एम., एन.एम.आय.एम.एस. शिरपूर कॅम्पस येथे लिवरेजिंग एआय टू एमपॉवर अँड ट्रान्सफॉर्म द नेक्स्ट जनरेशन ऑफ एज्युकेटर्स अँड रिसचर्स या विषयावर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम) ६ ते १० मे या कालावधीत संपन्न झाला असून कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कॅम्पसचे मान्यवर अधिकारी, विविध विद्याशाखांतील तज्ज्ञ उपस्थित होते.**

डॉ. सुनीता पाटील (संचालक, एनएमआयएमएस शिरपूर कॅम्पस) यांनी विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या ए आय धोरणाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, उपकुलगुरू स्वत: नवनवीन ए आय साधने वापरून इतरांना प्रेरणा देतात. विद्यापीठ धोरणानुसार प्रत्येक शाळेत अशा कार्यशाळांचे आयोजन होत असून, दर महिन्याला प्रकाशित होणाऱ्या मासिकात ए आय मधील महत्त्वाच्या घडामोडी समाविष्ट केल्या जातात.डॉ. एस. एस. पांचोली (सहयोगी डीन, एसपीटीएम शिरपूर) यांनी सांगितले की ए आय चा उपयोग शिकविण्याच्या पद्धती अधिक आकर्षक, संवादात्मक आणि प्रभावी करण्यासाठी करता येतो.डॉ. वेंकटाद्री मारीबोयिना (सहयोगी डीन, एमपीएसटीएमई, शिरपूर) यांनी सांगितले की, तंत्रज्ञानाचा वापर करणे पुरेसे नाही, तर तो अभ्यासक्रमाशी योग्यरीत्या जोडणे अधिक महत्त्वाचे आहे.पहिल्या दिवसाच्या सत्रांमध्ये डॉ.राजेंद्र पाटील, डॉ.निशिकांत राऊत, डॉ. दादासाहेब कोकरे यांनी एआयच्या माध्यमातून सादरीकरणे कशी सुधारता येतील, उच्च शिक्षणात त्याचा वापर, योग्य प्रश्न कसे विचारावेत, न्यूरोसायन्स संशोधनात एआय कशी मदत करू शकते याविषयी मार्गदर्शन केले.दुसऱ्या दिवशी डॉ.सतीश पोलशेट्टीवार (एमआयटी डब्ल्यू पी यु, पुणे) यांनी एआयचा वापर करून शिक्षक कसे जलद आणि प्रभावीपणे अभ्यास साहित्य तयार करू शकतात, विद्यार्थ्यांना समजण्यासाठी मदत करणारे तात्काळ उदाहरणे किंवा आरेखे कसे बनवू शकतात, संशोधन लेखांचे विश्लेषण कसे करता येते, हे दाखवून दिले. त्यांनी जबाबदारीने एआयचा वापर करावा, याचेही महत्त्व पटवून दिले.त्यानंतरच्या सत्रात डॉ.बंडू चातळे (एम ई टी, मुंबई) यांनी फार्मास्युटिकल क्षेत्रात ए आय चा कसा उपयोग होतो याचे उदाहरणांसह स्पष्टीकरण दिले. त्यांनी दाखवले की, ए आय चा वापर करून माहिती वेगाने शोधता येते, लेखांचे सारांश मिळवता येतात, आपली माहिती नीट सादर करता येते, संशोधनासाठी आवश्यक संदर्भ सोपे करून घेता येतात.

उपक्रमाचे समन्वयक डॉ.मयंक शर्मा यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. डॉ.महावीर सिंह यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी एसव्हीकेएम अध्यक्ष व एनएमआयएमएस चान्सलर आमदार अमरिशभाई पटेल, संस्था सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, मेंटॉर सौ. रिता पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ.सुनीता पाटील, डॉ. वेंकटाद्री एम (सहयोगी डीन, एम पी एस टी एम ई), डॉ. शामसुंदर पांचोली (सहयोगी डीन, एस पी टी एम) यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाजी गायकवाड (प्रशासक), सर्व प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

## धुळे एसटी आगारातील वाहक मनोज गवळी यांना राज्यपालांच्या हस्ते गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान



**धुळे, दि.१८- मुंबई येथे महाराष्ट्र शासन अंगीकृत कामगार कल्याण मंडळाच्या वतीने विविध क्षेत्रातील गुणवंत कामगारांचा राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन तसेच कामगार मंत्री आकाश फुडकर, कामगार आयुक्त रविकांत येळवे आणि अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील कामगार कल्याण मंडळाच्या सभागृहात गुणवंत पुरस्कार देण्यात आले. या सोहळ्यात राज्य परिवहन महामंडळातच्या धुळे आगारातील कर्तबगार वाहक मनोज देविदास गवळी (यमगवळी) यांना देखील विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

मनोज गवळी यांचा सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. सदरचा पुरस्कार गवळी यांनी त्यांच्या संपूर्ण कुटुंबाच्या उपस्थितीत स्वीकारला. मनोज गवळी हे सामाजिक कार्यकर्ते म्हणून वावरत असतांना शिवसेनेच्या माध्यमातून त्यांनी रक्तदान, वृक्षारोपण आणि अनेक सेवाभावी कार्यामध्ये कामे केली आहेत. एस.टी.महामंडळात काम करतांना कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी अग्रेसर राहून, कामगार सेनेमध्ये महत्त्वाची जबाबदारी ते पार पाडत आहेत. राज्य परिवहन महामंडळाच्या नोकरीतील त्यांची कर्तबगारी आणि सामाजिक कार्याची दखल घेऊनच महाराष्ट्र शासनाच्या, राज्य कामगार कल्याण मंडळाच्या वतीने त्यांना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापक, आगार व्यवस्थापक वाहतूक नियंत्रक भोला सगरे, विकास गवळी, सुनील यमगवळी, खान्देश तेली समाज मंडळाचे अध्यक्ष कैलास काळु चौधरी, रविंद्र चौधरी, राजेंद्र चौधरी, युवा उद्योजक सुनील उदिकर, युवा उद्योजक प्रशांतशेठ चौधरी, उमविचे सिनेटर सदस्य नितीन ठाकुर, सुनील गवळी, धनंजय गाळणकर, संजय गवळी, सुनील यमगवळी, वाहक चालकांसह अनेकांनी अभिनंदन केले आहे.




## कु.दिव्या जैनसह मातापित्यांचा जयहिंद संस्थेच्या वतीने सत्कार

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- धुळे येथील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी दिव्या जैन हीचा एसएससी परीक्षेत यश प्राप्तीबद्दल जयहिंद शैक्षणिक संस्थेच्या संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

धुळे येथील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु.दिव्या अनिल जैन (सांडेचा) हिला यंदा घेण्यात आलेल्या दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९६ टक्के गुण मिळाले. ती जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील हुशार विद्यार्थिनी असून तिचा विशेष सत्कार संस्थेचे चेअरमन विजय पाटील, सचिव शरद बच्छाव, संस्थेचे संचालक अरुण साळुंखे, मोहन मोरे, भूषण सावंत, जितेंद्र बच्छाव, शाळेचे प्राचार्य शिवाजी बैसाणे, उपमुख्याध्यापक सुनील मोरे, पर्यवेक्षक व्ही.टी गवळे आदिंच्या उपस्थितीत करण्यात आला. दिव्या जैनसह तिच्या आई वडिलांचा ही सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला.ती धुळे येथील प्रसिद्ध किराणा व्यापारी अनिल जैन यांची मुलगी आहे. यावेळी मनोगत व्यक्त करताना ती म्हणाली की,आज धुळे जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबवल्याने अभ्यासू विद्यार्थ्यांना न्याय मिळाला आहे.कु.दिव्या जैन प्रकाशा ता.शहादा येथील पत्रकार विनय जैन यांची आप्तेष्ट आहे.

## अग्नीशामन दलाच्या जवानांना अग्नीउपद्रव आटोक्याचे प्रशिक्षण

**धुळे, दि.१८- कुठल्याही कारणाने आपत्ती निर्माण होवुन अग्नीउपद्रव झाला तर तो अटोक्यात आणण्यासाठी काय केले पाहिजे, याचे कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. वाहतुक सुरक्षा आणि नागरी सुरक्षा समितीतर्फे धुळयातील अग्नीशामन दल-ातील जवानांसाठी विशेष प्रशिक्षण शिबीरे झाली. त्यात उंचावर असलेल्या मजल्यावर आगी लागली तर आग कशी विझवावी. जिवीतांचे आणि मालमत्तेचे संरक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**

राज्य शासनाच्या रस्ता सुरक्षा आणि नागरी संरक्षण समितीतर्फे धुळयात प्रशिक्षण शिबीर झाले. या शिबीराला महापालिकेच्या अग्निशामन दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्यात अमोल सोनवणे यांच्यासह संरक्षण समितीचे विभागीय समादेशक दिलीप स्वामी, अग्निशामन दलाचे प्रमुख दुष्यत महाजन, मांगीलाल शिंपी, उपविभागीय अधिकारी दत्तात्रय पाटील, अजय राजपूत, दीपक बेडसे, सचिन लाहोर, प्रवीण वाघ यांच्यासह धुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. धुळे शहरासह जिल्हयात गेल्या काही आठवडयात अग्नीउपद्रवाच्या घटना घडल्या. त्यात मोठया प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभुमीवर नागपुर येथील नागरी संरक्षण समितीतर्फे धुळयात विशेष प्रशिक्षण शिबीर झाले.

## पू.साने गुरुजी महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे, कला, विज्ञान आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय शहादा येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ नाशिक मार्फत घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.**




पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य तसेच किमान कौशल्य शाखेतील महाविद्यालयात गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या सर्वच शाखांच्या विद्यार्थ्यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक युवा नेते मयूरभाई पाटील यांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. प्रास्ताविक कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.श्रीमती कल्पना के. पटेल यांनी सादर केले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. के. पटेल, उपप्राचार्य डॉ.एस.डी. सिंदखेडकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एल.पटेल, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य आर. एस.पाटील, पर्यवेक्षक के. एच.नागेश ज्येष्ठ प्रा.व्हि.सी.डोळे, प्रा.अरविंद पाटील यांच्यासह प्राध्यापक वृंद उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा.मकरंद पाटील यांनी अभिनंदन केले आहे. सूत्रसंचालन आणि आभार प्रा.प्रकाश चौधरी यांनी केले.

## हेरगिरीप्रकरणी एकास अटक

नवी दिल्ली, दि.१८- हरियाणामधील यूट्यूबर ज्योती मल्होत्रा ऊर्फ ज्योती रानीला हेरगिरीच्या आरोपाखाली अटक झाल्यानंतर हरियाणामधून आणखी एका तरूणाला हेरगिरी केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. या आठवड्यातली ही तिसरी अटक आहे. २६ वर्षीय तरूण अरमानला नूह पोलिसांनी अटक केली.














## शब्दकोडे क्रमांक : २१६१



**आडवे शब्द :** १.सासरी होणारा छळ ५.इंग्रजीत-कावळा ६.एक सुवासिक फुल ८.पैसा ९.वाहन चालवणारा १३.समय १४. एक मोठ्या आकाराचा पक्षी १७.सर्प १९.कंटाळा १९.लमतत-उलट लिहा २१.उत्सव २३.पीळ मारलेला दोरखंड २५.मुस्लिम धर्मशाळा २७.प्रश्न २९.ढिग ३२.हिंदीत-चुक ३३.ऐतवार ३६.करणारा ३७.हिंदीत-ओ□ ३८.हिंदीत-ताप ३९.फांदी ४१.एक कोल्हापुरी दागिना ४३.प्रजा ४४.वंदनीय ४६.जिन्नस ४७.'दिव - - -'गुजरात येथील एक केंद्रशासित प्रदेश ४९.कंबर ५०.झोप-विरुदध ५१.एखाद्यास काबिज करणे ५२.समान उंचीवरचे ५३.हिंदीत-मन **उभे शब्द :** १. पूजा-अर्चा २.मुलाची पत्नी ३.नुसती बडबड करणारा ४.मनातील बोच ७. ठिकाण १०.सिगारेटचा एक झुरका ११.देवतांना एक अमर करणारे पेय १२.कोना १५.हाता एव्हढा १६.गुपित १८.मेणबत्तीतील मुख्य घटक २१.शिकवण २२.चुकीचा २३.देखणा २४. अभिनेता नागार्जुनचा एक सिनेमा २६.समुद्र २७.पंजाब प्रांतातून वाहणारी एक नदी २८.लाख ही संख्या ३०.सुत कातण्यासाठी वापरतात ३१.कोकणी बोलीत - या ३४.दही बनवण्यासाठी वापरतात ते दह्याचे थेंब ३५.रर ३६.हिंदीतील-कलेजा ३८.मजबूत ४०.एक प्रसिद्ध आंब्याची जात ४१.दुधावरील मलई ४२.एक उंची लोकरी वस्त्र ४५.एक रत्न ४६.मडके ४८. ठेका ४९.शका-उलट लिहा ५०.हिंदीत-लोकर

### शब्दकोडे क्रमांक : २१६० चे उत्तर



## पान १ वरुन

## सरन्यायाधिशांची उघडपणे नाराजी

महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष अॅड.विठ्ठल कोंडे-देशमुख, उपाध्यक्ष अॅड.अमोल सावंत आणि सदस्य अॅड.आशिष देशमुख यांनी सरन्यायाधिशांच्या सत्काराचे आयोजन केले होते. यावेळी न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती ए.एस. चांदुरकर, न्यायमूर्ती रेवती मोहिते-देवरे, खासदार मननकुमार मिश्रा, श्री.अनिल सिंह, श्री.देविदास पंगम आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अॅड.अमोल सावंत यांनी आभार मानले.

सरन्यायाधिश पुढे म्हणाले, मला प्रोटोकॉलचे बिल्कुलही काही वाटत नाही. अजूनही अमरावती आणि नागपूरला जात असताना पायलट एस्कॉर्ट घेऊन जात नाही. सुप्रीम कोर्टात येईपर्यंत अमरावतीला मित्रांच्या दुचाकीवरुन फिरायचो. राज्यघटनेच्या संस्थेचा प्रमुख पहिल्यांदा या राज्यात येत असेल आणि तोही त्या राज्याचा असेल तर जी वागणूक त्यांनी दिली याचा विचार करावा. मला लहान सहान गोष्टीमध्ये पडायचे नाही. आमच्यातील दुसरा कोणी असता तर आर्टिकल १४२ चा विचार केला असता. लोकांना कळले पाहिजे यासाठी उल्लेख केला, असे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले.

**अधिकाऱ्यांची धावाधाव**

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या सत्काराला उत्तर देताना नाराजी व्यक्त केल्यानंतर अधिकाऱ्यांची धावाधाव झाली. सत्काराचा कार्यक्रम झाल्यानंतर सरन्यायाधीश दादरच्या चैत्यभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दाखल झाले. त्यापूर्वी डीजी रश्मी शुक्ला सोबत मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती सुद्धा चैत्यभूमीमध्ये दाखल होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी चैत्यभूमी मध्ये दर्शन घेण्यापूर्वी डीजी रश्मी शुक्ला सोबत मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती आणि सुजाता सैनिक सोबत चर्चा केली. त्या चर्चेवेळी भूषण गवई यांनी नाराजी व्यक्ती केली. यानंतर तिन्ही अधिकाऱ्यांकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, चैत्यभूमीवरुन अभिवादन करुन बाहेर पडताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी जे झाले ते मी कळवले आहे. प्रोटोकॉल बाबत माझी कोणतीही नाराजी नाही असे म्हटले आहे.

## ढगफुटीसदृष पाऊस

आणि वाशिम या जिल्ह्यांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला आहे. महाराष्ट्रात ढगफुटी झाली आहे. बीडच्या आष्टी तालुक्यातील राळसांगवी परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे गावातील नदीला पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या पुलावरून पाणी जात असल्याने चार गावाचा संपर्क तुटलेला आहे. पुणे शहरात आज पुन्हा एकदा जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली. मागील दोन दिवसांपासून वातावरण ढगाळ असून, आज सलग तिसऱ्या दिवशीही पावसाने हजेरी लावली. सायंकाळनंतर अनेक भागांत मेघगर्जनेसह पावसाच्या सरी पडल्या, त्यामुळे तापमानात घसरण होऊन गारवा निर्माण झाला आहे. पाषाण, औंध, सिंहगड रस्ता, कात्रज, बाणेर, आणि शिवाजीनगर परिसरात पावसाचा जोर अधिक जाणवला.

## वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस

ठिकाणी झाले उन्मळून पडली आहे. तर विद्युत ताराही तुटून पडल्या. अतोनात झालेल्या अवकाळी पावसाच्या हजेरीमुळे नंदुरबार शहरात अनेक घरांची अंशतः पडझड झाली. तसेच नंदुरबार तालुक्यातील पिंपरी येथे एक घर व भिलाईपाडा येथे सात घरांची अंशतः पडझड झाली आहे. काकर्दे येथे एका घराची तर नवे हाटमोहीदा येथे एका घराची पडझड झाली आहे. तसेच ठाणेपाडा येथे एक पोल्ट्रीफार्मचे नुकसान झाले आहे. ठाणेपाडा शिवारात आंब्याची झाडे, आष्टे येथे कांदा तर खामगाव शिवारात शेतातील केळी व पपई पिकाचे नुकसान झाले. या अवकाळीचा फटका शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांनाही बसला आहे. नंदुरबार तालुक्यातील आष्टे, खोंडामळी, नंदुरबार या मंडळ हद्दीत नुकसान झाले आहे. या नुकसानीचा पंचनामा करण्याची मागणी कारण्यात आली आहे.

## नवा इतिहास घडवण्यासाठी!

सीताराम पावरा,भरत गावित, रतन पाडवी, मोहन शेवाळे, मोहन माळी, मधूकर पाटील, राजेंद्र बाविस्कर, शरद पाटील, धनंजय गावित, सिताराम पावरा, पुष्पा गावित, यशवंत ठाकरे, संदीप वळवी, दिपक वळवी, सागर मराठे, प्रशांत पटले, अनिल भिल, सुरेंद्र कुवर, छोटू कुंवर, संतोश पराडके, डॉ नितीन पवार, प्रकाश भोई, अनिल चौधरी, सोयेब खाटीक, प्रतिभा कुळकर्णी, अविनाश गावित, अनिल पगारे, मोहन ढोले, जितेंद्र कोकणी, अशोक तडवी, सिकंदर कुरेशी, इम्राण काकर, अजरमिया जहाँगरिदार,इम्रान भाई उर्फ गुडडुभाई शेख, सारांश भावसार, गोविंद शेवाळे, रणसिंग पाडवी आदी मान्यंवर उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, मेळाव्यात अनेकांनी तक्रार वजा विनंती केली, यापुढे पदाधिकाऱ्यांची कुठलीही तक्रार येणार नाही, याची दखल घेतली जाईल. येणाऱ्या काळात स्वानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविण्यासाठी पक्ष पातळीवर जी मदत हवी असेल ती दिली जाईल. जि.प., नगर पालिका व ग्राम पंचायतीवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकवण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. लवकरच पालकमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांच्या उपस्थितीत नंदुरबार जिल्हयात भव्य मेळावा घेण्यात येवून पक्ष संघटन मजबूतीसाठी प्रयत्न केले जातील. आदिवासी राज्यमंत्री पद असो किंवा आदिवासी विकास मंत्रीपद असो ही दोन्हीही पदे आपल्या पक्षात असल्याने या भागातील आदिवासींचे प्रलंबित प्रश्न.सोडविण्यावर प्रामुख्याने भर देण्यात येईल, असे चव्हाण यांनी सांगितले.डॉ.मोरे म्हणाले, धर्म ही अफूची गोळी आहे. सर्व धर्म समभाव हा सेक्यूलर विचार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अंमलात आणते. हे आजच्या पिढीसाठी आव्हानात्मक आहे. पक्ष प्रमुख अजितदादा पवार यांनी कधीही युवकांचे माथे भडकवण्याचे काम कधी केले नाही.केवळ विकासासाठी झटणारे दादा अशीच प्रतिमा त्यांनी निर्माण केली.धनंजय भरत गावित, भरत गावित, मोहन शेवाळे, मोहन माळी आदींनी मनोगत व्यक्त केले. सिताराम पावरा यांनी प्रास्ताविक केले तर आर.डी. राजपूत यांनी सुत्रसंचालन केले. मधूकर पाटील यांनी आभार मानले.

## शिरपूरमध्ये आज तिरंगा यात्रा

मंदिर चौक येथील स्वातंत्र्य सैनिक स्मारक येथे तिरंगा यात्रेचा समारोप होईल.या तिरंगा यात्रेत म्हणजेच राष्ट्रीय कार्यक्रमात नागरिक, महिला, युवा वर्ग यांनी सहभागी होण्याचे आवाहन आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, भाजपा जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, भाजपा शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल, धुळे जिल्हा परिषद माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, शिरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती के.डी.पाटील, भाजपा ग्रामीण तालुकाध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, होळनांथे मंडळ अध्यक्ष विरपाल राजपूत आदींनी केले आहे.

## राज्यभर कार्यक्रमांचे आयोजन

स्वच्छता करणे, चित्रकला निबंध स्पर्धा याचे आयोजन तसेच महिला मोर्चाच्या माध्यमातून शोभायात्रा काढणं असे विविध कार्यक्रम २१ ते ३१ तारखेपर्यंत भारतीय जनता पार्टीचा वतीने करण्यात येणार आहे. यासर्व कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावें असे आवाहन महामंत्री विजय चौधरी यांनी केले.यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी उपस्थित होते.

## प्रतिकुल परिस्थितीत भाज्या महागल्या

आहेत. बदलत्या वातावरणामुळे भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. गेल्या आठ दिवसांपासुन भाजीपाल्याच्या दरात किलोमागे २० ते २५ रूपयांची वाढ झाली आहे. भाजीपाला सरासरी ७० रूपये किलो दराने विक्री होत आहे. अशीच परिस्थिती पुढील महिनाभर राहिल. भाजीपाल्याचे दर वाढल्याने मध्यमवर्गीय महिलांनी नाराजी व्यनत केली आहे. काही दिवस राहील. साहजिकच भाजीपाल्याचे दर अजुन वाढणार आहेत. भाजीपाल्याच्या दर महागल्याने महिलांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्याने शहादेकर हैराण

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- शहरातील विविध भागात वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले असून हा प्रकार नित्याच्याच झाला असल्याने वीज ग्राहकांकडून तीव्र नाराजीचा सूर व्यक्त केला जात आहे.**



पूर्व सूचना देण्यात येऊन वीज वितरण कंपनीच्या वतीने मान्सूनपूर्व कामांसाठी तसेच ३३/११ केवी सबस्टेशन मधील दुरुस्ती कामासाठी वीजपुरवठा बंद केला जातो.मात्र सध्या त्या व्यतिरिक्त शहरातील विविध भागात दिवसातून अनेकदा वीज पुरवठा खंडित होत आहे. किरकोळ वारा पाऊस आला तरी वीज पुरवठा बंद होत असल्याने वीज ग्राहकांकडून नाराजीचा सूर व्यक्त होत आहे. याव्यतिरिक्त दिवसातून अनेकदा वीज पुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी अधिक दाबाने वीज पुरवठा होत असल्याने विजेवर चालणारी उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे खराब होण्याचे प्रमाणही वाढले आहे. वीज वितरण कंपनीने याबाबत दखल घेणे आवश्यक आहे. सध्याचे शहरातील वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण बघता वीज वितरण कंपनीने सबस्टेशनमधील कुचकामी मशिनरी बदलून योग्य प्रकारची मशिनरी बसविण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याने त्रासलेल्या वीज ग्राहकांकडून व्यक्त होत आहे.

## कुकडेल मार्गे शहरातून होणारी वाहतूक अपघाताला निमंत्रण देणारी; शहाद्यातील प्रशासन मात्र सुस्त

**शहादा, दि.१८ (का.प्र.)- शहरातून कुकडेल मार्गे वाहतूक वळविण्यात आली असून अपघाताला निमंत्रण देणारी वाढती वाहतूक कोंडी बस स्टँड परिसरात प्रमुख अडथळा निर्माण करत आहे. याठिकाणी नो पार्किंग आणि पर्यायी मार्गांची गरज असल्याची प्रतिक्रिया वाहनचालक व्यक्त करत आहेत. मात्र संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी कान बंद केले असल्याने वाहतूक कोंडी सर्वसामान्य नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.**



शहादा शहरात दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक कोंडी आता गंभीर स्वरूप धारण करत आहे. विशेषतः बस स्टँड परिसरात नागरिक आणि प्रवाशांना दररोज प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. बस स्टँडजवळील टर्निंग पॉईंटवर दुचाकी, चारचाकी आणि मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचे बेधडक पार्किंग होत असल्याने मार्ग सतत अडथळले जात असून त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी उद्भवत आहे. या समस्येचे मुख्य कारण म्हणजे बस स्टँडसह शहरातील विविध वळणांवर नो पार्किंग झोनची कमतरता ही आहे. प्रशासनाने जर प्रत्येक महत्त्वाच्या वळणावर आणि चौकात नो पार्किंगचे फलक लावून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली तर शहादा शहरातील वाहतूक समस्या सुटू शकते असा नागरिकांचा ठाम विश्वास आहे. शहरातील व्यापारी, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, बस स्टँड परिसर, प्रमुख चौक, वळणे आणि गर्दीच्या ठिकाणी नो पार्किंग झोन निश्चित करून अन्यत्र वाहने उभी करण्यास सक्त मनाई केली जावी. यामुळे वाहतूक सुरळीत होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल.याशिवाय शहादा बस स्टँडवरून डोंगरगाव, खेतीया दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग उभारण्याची गरजही शहरवासीय व्यक्त करत आहेत. बस टर्न घेताना निर्माण होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बस स्टँडजवळ कोर्टाच्या समोरून विशेष गेट उभारून वाहतूक कोर्टच्या बाजूने वळवण्याची आवश्यकता आहे. यासाठी बस आगार प्रमुखांनी तातडीने कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे. सध्या एसटी बसेसची कुकडेल मार्गे ये-जा सुरू आहे. त्यामुळे ट्रॅफिक जाम शहादा शहरातील एक गंभीर समस्या बनली आहे आणि प्रशासनाची कार्यपद्धती याबाबत सुस्त असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नगर परिषद, पोलीस आणि वाहतूक विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात अशी सर्वसामान्यांची ठाम मागणी आहे.

## कुसुंब्यातील आदित्य शिंदे दहावीत राज्यात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण



**धुळे, दि.१८- कुसुंबा ता.जि.धुळे येथील आदित्य शिंदे याने केंद्रीय माध्यमिक मंडळ (सीबीएसइ) बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक व राज्यातून द्वितीय क्रमांक पटकावत गावाचे नाव उज्वल केले आहे. त्याच्या या उत्तुंग यशामुळे शिंदे कुटुंबीयांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.**

आदित्य हा धुळे येथील चावरा पब्लिक स्कूलचा विद्यार्थी आहे नर्सरीपासून चावरा स्कूल ला आदित्य चे शिक्षण झालेले आहे. त्याच्या यशात चावरा पब्लिक स्कूल मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांचाही मोलाचा सहभाग आहे. आदित्य हा गावातील प्राथमिक-शिक्षक शिक्षिकेचा मुलगा असून, त्याचे आजोबा व आजी हे दोघेही निवृत्त शिक्षक आहेत. घरातच शिक्षणाचा वारसा लाभलेला आदित्य बालपणापासूनच अभ्यासात कुशाग्र बुद्धीचा विद्यार्थी म्हणून ओळखला जात होता. त्याने अभ्यासात सातत्य, शिस्त व चिकाटी याच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. आदित्यच्या या यशाबद्दल गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षकवृंद, तसेच विविध संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षण क्षेत्रात आपली वाटचाल पुढेही यशस्वीपणे सुरू ठेवण्याचा निर्धार आदित्यने व्यक्त केला आहे.

## पावसाळ्यापूर्वी रस्ते दुरुस्त करा : मागणी

धुळे- शहराची लोकसंख्या व व्यापकता झपाट्याने वाढत आहे. म.न.पा चे क्षेत्र वाढल्यामुळे नवीन कॉलन्याही वाढल्या आहेत.त्यामुळे शहरात व कॉलनी परिसरात वाहतुकीचे प्रमाण बऱ्यापैकी वाढले आहे. वाहतूक जास्त असल्याने रस्ते वारंवार खराब होतात. कॉलन्यांमध्ये रस्त्यांची अवस्था अधिकच खराब आहे. पावसाळा सुरु झाल्यानंतर चिखल व खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.ही बाब लक्षात घेऊन पावसाळा सुरु होण्याआगोदरच शहरातील व कॉलनी परिसरातील रस्ते दुरुस्त करण्याची मागणी मी धुळेकर संघटनेने पालिकेकडे केली आहे.

## जाब विचारण्यासाठी आज आंदोलन

(पान १ वरुन) आहे? कामाचे स्वरूप काय? एस्टीमेट किती? याबाबत काहीच कळायला मार्ग नाही.नागरिकांसाठी सुरु असलेल्या कामाबद्दल नागरिकांना माहिती देण्यात अडचण काय?नागरिकांना विश्वासात कां घेतले जात नाही?

**नगरपालिकेचा करार काय?**

किती वर्षाचा? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.याचा जाब विचारण्यासाठी आज सोमवार दिनांक १९ मे रोजी दुपारी ३ वाजता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर नागरिकांचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे सोशल मीडिया नेटवर्कद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

## धुळे बाजार समितीत कांद्याला सहाशे रुपये दर खान्देशातील कांदा उत्पादक शेतकरी नाराज

**धुळे, दि.१७- धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला ६०० ते ७०० रुपये प्रतिक्वंटल दर मिळत आहे. कांदा उत्पादनावर झालेला खर्च लक्षात घेता शासनाने किमान १ हजार ५०० रुपये दर द्यायला हवा, अशी मागणी शेतकऱ्यांची आहे. बाजार समितीत शुक्रवारी अपेक्षित आवक नसतांना देखील कांद्याचे दर कमी होते.**



धुळे जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकरी कपाशी पाठोपाठ कांद्याचे उत्पादन घेतात. साहजिकच नाशिक नंतर आता धुळे जिल्हा कांदा उत्पादनात अग्रेसर ठरू पाहत आहे. परंतु बाजार समितीत कांद्याला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. शुक्रवारी धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला ६०० ते ७०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. यावेळी शेतक-यांनी सांगितले की, कांदयाचे बियाणे, रोप तयार करणे, गादी वाफे करून कांदेलागवड, किटकनाशकांची फवारणी, रासायनिक खतांची मात्र देणे, यावर बहुसंख्य पैसा खर्ची होतो. कांदा उत्पादनावर झालेला खर्च लक्षात घेतला तर खर्च देखील निघणार नाही. कांदयावर झालेला खर्च लक्षात घेवुन शासनाने किमान १ हजार ५०० रुपये दर द्यायला हवा, अशी मागणी कांदा उत्पादक शेतक-यांनी केली.

Bharatgas COOK FOOD. SERVE LOVE.
**तिरुपती गॅस एजन्सी**
**ग्राहकांना विनम्र आवाहन**
धुळे येथील तिरुपती गॅस एजन्सी तर्फे ग्राहकांना आवाहन करण्यात येते की, सध्या शासनाच्या आदेशानुसार गॅस ग्राहकांचे ई केवायसी करण्याचे काम सुरु आहे. ज्या ग्राहकांनी अद्याप ई केवायसी केले नाही. त्यांनी लवकरात लवकर गॅस एजन्सी कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन ई केवायसी करुन घ्यावे सदर के वायसी न केल्यास ग्रहकांचे गॅस कार्ड रद्द होऊ शकते याची नोंद घ्यावी. कार्यालयाची वेळ १० ते ५ वाजेपर्यंत.
टीप :- ग्राहकांनी ई केवायसी करण्यासाठी सोबत गॅस कार्ड व आधार कार्ड आणावे. ग्राहकांनी स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे.
व्यवस्थापक
शिक्का
तिरुपती गॅस एजन्सी, गल्ली नं. २
पुर्ती बिल्डिंग जवळ, धुळे

**पाहिजेत**
१) बी.ई. मॅकनिकल १ पद (पुरूष)
२) टॅली एक्सेल इंटरनेट वर्ड ऑपरेटर- १ पद (पुरूष, महिला)
भेटण्याची वेळ सकाळी ११ ते दुपारी २
कोयल ट्रान्सपोर्ट
४० गाव रोड चौफुली जवळ, धुळे
-: संपर्क :-
७०५७०९२६६९

**पाहिजेत**
१) १० वी/१२ वी पास-नापास मुले पाहिजेत.
२) मार्केटींगसाठी स्वत:ची मो.सायकल असलेले अनुभवी मुले पाहिजेत.
३) पूर्णवेळ ड्रायव्हर पाहिजे (मारुती व्हॅन)
समक्ष भेटा! सकाळी १० ते १२
कट एन कार्व
ओम डिजीटल, ग.नं.६, कोंडाजी तालीम जवळ, धुळे

**पाहिजेत**
साऊथ इंडियन रेस्टॉरंट मध्ये काम करण्यासाठी मुले व मुली पाहिजेत. योग्यता १० वी/१२ वी पास
१) कूक जागा २
२) हेल्पर - २
३) कॉम्प्युटर ऑपरेटर-१
पत्ता : दत्त मंदिर चौक, देवपूर, धुळे
9822297970

**फ्लॅट भाड्याने देणे आहे**
साईगुंजन अपार्टमेंट प्रोफेसर कॉलनी, देवपूर येथील फ्लॅट नं.२०९- 2 BHK भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
8208137929
9096914841

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
होलसेल हँडलूम व लेडिज ड्रेस मटेरियल दुकानासाठी लेडीज/जेन्टस् पाहिजेत.
आकर्षक पगार.
मे.दयानंद काशीराम
१८१३, गल्ली नं.२, जैन मंदिरासमोर, धुळे

**कराराने देणे आहे**
६०० स्क्वे.फूट जागा बँक, लॅब, ऑफिससाठी कराराने देणे आहे.
पत्ता- गल्ली क्र.५, शाळा क्रं.९च्या बाजुला धुळे
-: संपर्क :-
मो.नं.९८२३५६१५२६

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल दुकानामध्ये कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत
१) कॉम्प्युटर आपरेटर/अकाउंटन्ट
२) सेल्समन बाहेरगांवासाठी
३) मदतनीस
४) टेलीफोन कालींगसाठी
संपर्क - संजय मेडिकल्स् गल्ली नं.२, धुळे
मो.नं.८४८३०३२९७५
९४२२२८७८२१

**पाहिजेत**
अनमोल पुस्तकालय दुकान कामासाठी मुले पाहिजेत.
अनमोल पुस्तकालय आग्रारोड फुलवाला चौक, धुळे
फोन नं.२७०३२९

**पाहिजेत**
सेल्समन- ३ पुरुष हेल्पर
-: संपर्क :-
स्वर्ण पॅलेस
१७२६, आग्रारोड, धुळे
02562-232428
233991/355891

**दुकान विकणे आहे**
धुळे महानगर पालिका प्रबोधनकार ठाकरे संकुल दुकान क्र.५०
-: संपर्क :-
सुनिल नथ्थु चौधरी
9423226396
9172054777

**जागा विकणे आहे**
फार्म हाऊस योग्य एक एकर जागा तीखी डेडरगाव तलाव रोड टच विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
५१०० चौरस फुटाचा प्लॉट पंचायत समितीच्या पाठीमागे दोन रोड कॉर्नर (नॉर्थ ईस्ट कॉर्नर) विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
बार साठी अनुभवी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान असावे.
-: संपर्क :-
हॉटेल प्रितम पॅलेस
नवीन महापालिकेसमोर, धुळे
9765901313

**जेबी रोड जागा विकणे**
शहराच्या मध्यवर्ती भागात जमनालाल बजाज रोड या व्यापारी रोडवर १०० बाय १२.५ मोक्याची जागा विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**मालेगाव रोडटच प्लॉट विकणे**
अंदाजे ६००० चौरस फुटाचा प्लॉट मालेगाव रोड टच गणपती पॅलेसच्या समोर विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**विकणे आहे**
बेकरी युनिट चाली कंडीशन मध्ये विकणे आहे
-: संपर्क :-
8669106417
7219531467

**कुलिंग इंडिया की पहचान**
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०